JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ग्रामीण आणि दलित कादंबरीच्या व्यक्तिचित्रणातील अनुबंध

**संदीप भूजंग शेकडे**
संधोधक विद्यार्थी,
डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

ग्रामीण आणि दलित कादंबरी सामाजिक बांधिलकी मानणारी कादंबरी आहे. या कादंबरीने सामाजिक वास्तव मांडत असताना स्व आणि स्वेत्तर समाजातील लोकांचे दोष दिग्दर्शनही केले आणि एकूणच दोषरहित समाजाची अपेक्षाही केलेली आहे. ग्रामीण कादंबरी ही कृषी संस्कृतीवर आधारलेल्या माणसाला चित्रित करते. तर दलित कादंबरी ही व्यवस्थेने पिचलेल्या, पायदळी तुडविल्या गेलेल्या माणसाला चित्रीत करते. समाज परिवर्तनाची अपेक्षा या दोन्ही प्रवाहांतील कादंबरी वाङ्मयाने केलेली आहे. म्हणून ग्रामीण आणि दलित या दोन्ही कादंबऱ्यांचे स्वरूप हे सामाजिक आहे. ग्रामीण आणि दलित या कादंबऱ्यांमधून वास्तवात जगणाऱ्या व्यक्तींची व्यक्तीचित्रे उभी केली गेली आहेत. या व्यक्ती अन्यायाने आणि परिस्थितीने म्हणजेच आसमानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांमुळे पिडलेल्या दिसून येतात. दलित कादंबरीतील व्यक्तीचित्रणे ही हजारो वर्षे गुलामगिरी सहन करणारी आहेत. मी माणूस आहे. हे भान पूर्वी त्या व्यक्तीला नव्हते. ते भान आले ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे. अशा व्यक्तींची ठाशीव चित्रणे आपल्याला 1980 नंतरच्या दलित कादंबरीत पाहावयास मिळतात. तसेच परिस्थितीने गांजलेले, यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण यामुळे हातचा रोजगार गेलेली हवालदील झालेली व्यक्तीचित्रणे ग्रामीण कादंबरीमध्ये पहावयास मिळतात. हा व्यक्तिचित्रणातील अनुबंध ग्रामीण आणि

दलित कादंबरीच्या संदर्भात पहावयास मिळतो. दलित कादंबरीतील व्यक्तीचित्रणं परिस्थितीने गाजलेली असली तरी ते या परिस्थितीला छेद देऊन विद्रोह करताना दिसतात. ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिचित्रणं ही दलित कादंबरीतील व्यक्तिचित्रणासारखी विद्रोह मात्र करत नाहीत. ही तफावतही या व्यक्तिचित्रणात आढळून येते.

दलित कादंबरी विशिष्ट उद्देशातून लिहिली जाते. हा उद्देश साध्य करण्याकरिता नायकाच्या भूमिकेमध्ये जिवंत व्यक्तिचित्रणे कादंबरीकार यांनी उभी केलेली आहेत. कुठल्यातरी ध्येयाने झपाटल्याशिवाय दलित कादंबरीतील व्यक्तिचित्रण पूर्ण होत नाही. त्यामुळे दलित लेखकांनी व्यक्तिरेखांचा ध्येयवाद महत्त्वाचा मानलेला दिसून येतो. ग्रामीण कादंबरीमध्ये नायकासमोर विशिष्ट उद्दिष्ट असले तरी ध्येयवादाने झपाटलेला विद्रोही नायक मात्र ग्रामीण कादंबरीमध्ये दिसून येत नाही.

दलित कादंबरीतील व्यक्तीचित्रणं केवळ कथानक सजविण्याकरता येत नाहीत तर त्यांच्यात संघर्षरत, क्रांतिकारक व्यक्तिमत्व दडलेले असते. त्यांच्या अंगी कर्तृत्वाचे बळ आहे. ते क्रांतिकारी आहेत. काहीतरी नवे निर्माण करण्याची जिज्ञासा बाळगणारी ही व्यक्तीचित्रणं दलित कादंबरीमध्ये सर्वत्र आढळून येतात. म्हणूनच ही व्यक्तीचित्र आपल्याच मनातील भावना व्यक्त करणारे आहेत, असे वाचकाला वाटत राहते. समाजात इतरत्र या व्यक्तिरेखा आपल्या ओळखीच्या असल्यासारख्या वाटतात. मनुवादी समाजाने दलितांवर लाभलेले लांछनास्पद जीवन, त्यांच्यावरचे अत्याचार हे समाजात प्रत्यक्षात घडणारी वास्तवता आहे. म्हणून दलित कादंबरीतील पात्रे जणू काही परिवर्तन घडवून आणू पाहणारी वास्तववादी क्रांतिकारी भूमिका वठवणारी चालती बोलती प्रत्यक्षातली माणसेच वाटतात. त्यामुळे दलित कादंबरीतील व्यक्तीची प्रेरणा हे क्रांतिकारी जिवंत व वास्तववादी वाटते.

ग्रामीण कादंबरीतील अनेक व्यक्तीरेखा देखील परिस्थितीशी झुंज देतात. ग्रामीण समाजाला वास्तव स्वरूपामध्ये चित्रित करताना आपल्या अनुभवातली माणसं व्यक्तीचित्रणाच्या स्वरूपामध्ये ग्रामीण कादंबरीकारांनी देखील चित्रीत केलेली आहेत. ग्रामीण आणि दलित कादंबरीतील व्यक्तिचित्रणांच्या संदर्भातील

अनुबंध हा स्त्री व्यक्तिचित्रणांच्या बाबतीत देखील दाखवता येईल. कोणत्याही समाजातील स्त्री ही पुरुषी व्यवस्थेची गुलामच राहिलेली आहे. ग्रामीण आणि दलित कादंबरीत येणाऱ्या स्त्रिया या संघर्षशील आणि परिस्थितीने गा◌ंजलेल्या आहेत. दलित कादंबरीमध्ये शहरी दलित स्त्रिया, नोकरी करणाऱ्या स्त्रिया, जुन्या-नव्या विचारांच्या भवऱ्यात अडकलेल्या दलित सुशिक्षित स्त्रिया, सभा संमेलने मोर्चे निदर्शने यामधून येणाऱ्या स्त्रिया, त्याच्या सामाजिक दृष्टिकोन, सामाजिक, कौटुंबिक संघर्ष यासह चित्रीत झालेल्या आहेत. ग्रामीण कादंबरीतदेखील कुटुंबवत्सल स्त्रियांबरोबरच कुटुंबाच्या बाहेर नोकरीच्या ठिकाणी आणि समाजात इतरत्रही संघर्ष करणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रतिमा इंगोले यांच्या पार्टटाइम या कादंबरीतील अनुराधा ही व्यक्तिरेखा. ग्रामीण भागातील एका उच्चशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापिका आहे. तिचा पुरुषी व्यवस्थेने केलेला छळ तिच्यावर केलेला अन्याय ही कादंबरी व्यक्त करते. या कादंबरीतून संघर्ष करत करत आपला स्वतंत्र मार्ग शोधणारी अनुराधा नायिकेच्या स्वरूपामध्ये चित्रित होते. दलित कादंबरीमध्ये जशी परिवर्तनवादी स्त्री चित्रीत झाली आहे तशीच ग्रामीण कादंबरीमध्ये देखील परिवर्तनवादी स्त्री चित्रीत झालेली आहे.

दलित कादंबरीत कादंबरीकारांनी दलित स्त्रीचे व्यक्तीचित्रण तिच्याच पातळीवर जगलेल्या अनुभवातून केलेले दिसून येते. त्यांची जीवनविषयक बांधिलकी त्यांच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवते. दलित कादंबरीतून येणारी दलित स्त्री ही वास्तव स्वरूपात येते. म्हणून दलित कादंबरी ही कधीच रंजनात्मक किंवा स्वप्नाळू झालेली नाही. 1980 नंतर ची ग्रामीण कादंबरी मोठ्या प्रमाणात वास्तव आशय घेऊन येते. त्यामुळे तिच्यातील व्यक्तीचित्रण◌ं देखील वास्तविक पातळीवरील आहेत. दलित कादंबरीने विधवा, परित्यक्ता, वेश्या यांच्या जीवनातील संघर्ष त्यांच्या व्यक्तिचित्रणांमधून चित्रित केलेला आहे. तसेच ग्रामीण कादंबरीने देखील विधवा, परित्यक्ता आणि वेश्या यांच्या जीवनातील वास्तव आशय या स्त्री व्यक्तिचित्रणांमधून मांडलेला आहे.

दलित कादंबरीमध्ये मोठ्या प्रमाणात खेड्यातील जीवनच साकार झालेले आहे. खेड्यातील दलितांचे राहणीमान, अस्पृश्यता, जातीयता, त्याम◌ुळे निर्माण

होणारी तेढ तसेच खेड्यापाड्यातून जाणवणारी गरीबी, दलितांचे ठरलेले व्यवसाय व त्या व्यवसायातून त्यांची होणारी कुचंबना या सर्व गोष्टींचे चित्रण दलित कादंबरीकारांनी या व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून केलेले आहे. यासोबतच ग्रामीण कादंबरीने देखील खेड्यापाड्यातील दलितांचे जीवन चित्रीत करताना दलित व्यक्तीचित्रणं वास्तव स्वरूपामध्ये उभी केलेली आहेत. खेडवळ जीवनाशी साजेसे असे त्यांचे व्यक्तिचित्रण या कादंबरीकारांनी केलेले आहे. खेड्यातून कातडी रंगविण्याचा धंदा करणारे ढोर, गावकीचा व्यवसाय करणारे महार, फडे-टोपलीचा व्यवसाय करणारे मातंग, कैकाडी व त्यांच्यासारखेच बारा बलुतेदार आणि आलूतेदारही जे पारंपरिक व्यवसायातच धन्यता मानून जगणारे आहेत, या सर्वांची वास्तवदर्शी व्यक्तिचित्रणं दलित कादंबरीने जशी वास्तव रुपात केली आहेत, तशीच ती ग्रामीण कादंबरीने देखील केलेली आहेत. दलित समाजामध्ये जन्माला आलेल्या आणि दलित समाजातच वाढलेल्या व्यक्तींची व्यक्तीचित्रणं दलित कादंबरीमध्ये जशी फाटक्या स्वरूपामध्ये येतात. त्यांचे जे पोशाख असतात, त्यांची जी आर्थिक परिस्थिती आहे ही सर्व जशीच्या तशीच ग्रामीण कादंबरीमधील दलित व्यक्तिरेखांमध्ये देखील येताना दिसते. दलित कादंबरीमध्ये दलितांच्या जवळ पक्की घरे नाहीत, भांडीकुंडी नाहीत, त्यांचा संसार वाऱ्यावर आहे, जीवन देखील दुसऱ्याच्या भरवशावर त्यांना जगावे लागते. हे त्यांच्या परिस्थितीचे वास्तव चित्रण दलित कादंबरीमध्ये येते तसेच ग्रामीण कादंबरीमध्ये येणारे दलितांचे वर्णनही याच प्रकारचे आहे. ग्रामीण कादंबऱ्यांत ही दलितांची साधीसुधी झोपडी असते. पक्की घरे तेथेही त्यांच्याकडे नाहीत. पुरेसा संसार नाही. पुरेशी भांडीकुंडी नाहीत आणि ग्रामीण भागातील सवर्णांच्या शेतावरच त्यांना आपली गुजरान करावी लागते. मोलमजुरी करून जगणारी दलित व्यक्तीचित्रणं ही ग्रामीण कादंबरी मध्ये देखील व्यक्त झालेली आहेत.

वास्तवातला माणूस केवळ ऐकूण किंवा पाहून केलेले चित्रण हे बेगडी होते. पण हा वास्तवातला माणूस अनुभवून केलेले चित्रण वास्तवाच्या पातळीवर जाते. दलित आणि ग्रामीण या दोन्ही प्रवाहांतील कादंबरीकारांनी या व्यक्ती प्रत्यक्षात अनुभवून त्यांची व्यक्तिचित्रणं उभी केली आहेत. त्यांची पृष्ठभूमी एकच आहे. त्यांचा वावरही एकाच काळातला आहे. त्यामुळे या व्यक्तिचित्रणात कमालीचा अनुबंध पहावयास मिळतो.

## संदर्भग्रंथ


1. निंबाळकर वामन, दलित साहित्य : स्वरूप व भूमिका
2. पानतावणे, गंगाधर विद्रोहाचे पाणी पेटले आहे
3. फडके भालचंद्र, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह
4. यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या
5. कुलकर्णी गो. म., मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह